# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर-४१३ २५५ (महाराष्ट्र)

Solapur -Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)

✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ संकेतस्थळ : २३५१३००

ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०


**◉ Examination and Evaluation Section ◉**

Ref. No. PAHSU/BOEE/ 597 Date : 10 APR 2026

10/4/2026

**विधी (LLB, B.A.LLB., LLM) परीक्षांकरिता त्या त्या महाविद्यालयास परीक्षा केंद्र देण्यासंदर्भात**

**परिपत्रक ( अत्यंत तातडीचे व कालमर्यादित)**

**संदर्भ : १. मार्च २०२६ च्या पदव्युत्तर पदवी ( PG) परीक्षांकरिता त्या त्या महाविद्यालयास परीक्षा केंद्र देण्यासंदर्भात महाविद्यालयामध्ये CCTV प्रणाली अद्ययावत करुन त्याचा IP Adress सह अहवाल परीक्षा विभागाकडे जमा करावयाच्या अनुषंगिक परिपत्रक क्र. PAHSU/BOEE/१५७ दि.१३/२/२०२६**

**२. CCTV कॅमेरासंदर्भातील माहिती सादर करण्यासंदर्भातील परीपत्रक क्र. ४६७ दि. २५/३/२०२६**

**३. या कार्यालयाचे CCTV संदर्भातील परिपत्रक क्र. ४८२ दि. २७/३/२०२६**

संदर्भीय परिपत्रक क्रं. १ व २ व ३ नुसार सर्व महाविद्यालांना मार्च २०२६ च्या परीक्षांच्या तयारीच्या अनुषंगाने आपण आपल्या महाविद्यालयातील स्ट्रॉंगरुम व प्रत्येक परीक्षा हॉल मध्ये CCTV कॅमेरे Backup सह बसविणे आवश्यक आहेत. तसेच महाविद्यालयातील स्ट्रॉंगरुम व प्रत्येक परीक्षा हॉल मधील CCTV कॅमेरे Backup जे विद्यापीठाने आवश्यकतेनुसार मागणी केल्यास विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त परिपत्रकानुसार महाविद्यालयास संदर्भ क्र. २ अन्वये CCTV ची माहिती दि. ५ मार्च २०२६ पर्यंत विद्यापीठामध्ये जमा करण्यासंबंधी सूचित करण्यात आले आहे.

तसेच संदर्भ क्रं. २ अन्वये सदरची CCTV ची माहिती सादर करण्याबाबत महाविद्यालयास दि. ३० मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. तथापि अद्यापही महाविद्यालयांनी CCTV संदर्भातील परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून मागविण्यात आलेल्या माहितीचा अहवाल परीक्षा विभागाकडे सादर केलेला नाही.

**सबब सर्व महाविद्यालयांनी / संकुलांनी त्यांनी त्यांचा Static Public IP हे दोन्ही गोष्टी नमूद CCTV अहवालामध्ये नमूद करुन सदरचा अहवाल दि. १३/४/२०२६ पर्यंत खालील email पाठवून द्यावा. अहवालामध्ये खालील माहितीचा उल्लेख असणे अनिवार्य आहे. (अधिक माहितीसाठी ९१३०७८४४०७ / ९५४५४४६६९३ या क्रमांकावर संपर्क साधावा.)**

Email - snehaal@edulab.in, itcell@sus.ac.in

तरी आपण आपल्या महाविद्यालयातील CCTV संदर्भातील अहवाल खालील उल्लेख केलेल्या माहितीसह दि.१३/४/२०२६ रोजी दु. १२ पर्यंत IT Cell विभागाकडे सादर करावा. तसेच त्याची एक प्रत वर उल्लेख केलेल्या ईमेल वरती पाठविण्यात यावी.

४. महाविद्यालयातील परीक्षा हॉल मध्ये CCTV कॅमेरे उपलब्ध आहेत का ? असल्यास CCTV कॅमेरा उपलब्ध असलेल्या हॉल ची संख्या कळवावी.

५. महाविद्यालयातील परीक्षा हॉल मध्ये CCTV कॅमेरांना इलेक्ट्रीसिटी बंद झाल्यानंतर Power Backup ची सुविधा Inverter अथवा Generator ची सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे तसेच त्याचा किती तास Backup सुरु राहतो.

६. महाविद्यालयातील परीक्षा कालावधीमधील CCTV कॅमेरा रेकॉर्डीग फुटेज बॅकअप किती दिवसापर्यंत साठविता येतो. ? व त्याचे स्टोरेज ठेवण्याकरिता काय सुविधा करण्यात आलेली आहे.

महाविद्यालयांनी मार्च २०२६ च्या परीक्षांकरिता परीक्षा हॉल मध्ये CCTV कॅमेरे बसविणे अनिवार्य आहे. तसेच याबाबतचा वरील माहितीसोबत महाविद्यालयातील कॅमेरा संदर्भातील IP Adress व त्याचा Login आणि Password विद्यापीठातील IT विभागाकडे **दि. १३/४/२०२६ रोजी दु. १२** पर्यंत जमा करणे आवश्यक आहे.

**सर्व महाविद्यालयाकडून वरीलप्रमाणे CCTV संदर्भातील माहिती प्राप्त झाल्यानंतरच महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थी व त्यांच्या मार्च २०२६ च्या परीक्षासंदर्भात व परीक्षा केंद्र बाबतचा निर्णय घेण्यात येईल. वरील प्रमाणे जे महाविद्यालय अहवाल सादर करणार नाहीत अशा महाविद्यालयांना परीक्षा केंद्र दिले जाणार नाही. तसेच संबंधीत महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र CCTV सुविधा असणाऱ्या अन्य महाविद्यालयांना देण्यात येईल सदर महाविद्यालयाच्या अंतर अधिकचे असल्यास अशा महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना परीक्षा कालावधी ने-आण करण्याची व त्याकरिता येणाऱ्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयाची असेल तसेच उपरोक्त कारणामुळे एखादा विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

संचालक

परीक्षा व मुल्यमापन विभाग

**प्रत - माहितीस्तव मा. कुलगुरु व मा. प्र-कुलगुरु कार्यालय**